# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

**लक्ष्मी पूजनाची सभा**

दिनांक 23ऑक्टोबर 1996

प्रिय सभासद बंधू भगिनीनो,

आपल्या संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे "श्री लक्ष्मीपूजनचा कार्यक्रम" शुक्रवार दिनांक 11 ऑक्टोबर 1996 रोजी आपल्या संस्थेचे सदस्य श्री मधूकर संभाजी राणे यांचे निवास स्थानी आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सर्व सभासद बंधु-भगिनींना विनंती करण्यात येते की सर्वांनी वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

आपला

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

# फळसेवाडी हितकारी संस्था
## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : शुक्रवार 11 ऑक्टोबर 1996
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डिंग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 6. श्री मधुकर संभाजी राणे |
| 2. श्री भगवान रामचंद्र साटम | 7. श्री दिलीप मधुकर राणे |
| 3. श्री सत्यविजय शिवराम राणे | 8. श्री रमेश रघुनाथ राणे |
| 4. श्री श्रीधर आत्माराम राणे | 9. श्री यशवंत तुकाराम सावंत |
| 5. श्री उत्तम वामन राणे | 10. श्री दशरथ राणे |

उपरोक्त संस्थेची लक्ष्मीपूजनाची सभा श्री मधुकर संभाजी राणे यांच्या निवासस्थानी झाली यावेळी कार्यक्रमास 10 सभासद उपस्थित होते.

सालाबादप्रमाणे लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम सायंकाळी 6:30 वाजता संस्थेचे चिटणीस श्री सुनिल सदानंद राणे यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे वयोवृध्द सभासद श्री भगवान रामचंद्र साटम यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती.

अध्यक्षांच्या परवानगीने वाडीतील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. संस्थेचे चिटणीस श्री सुनिल सदानंद राणे यांनी वाडीतील कामकाजाबाबत थोडक्यात माहीती सांगितली. वाडीतील समस्यांबाबत व त्यांची सोडवणूक करण्याबाबत वाडीतील ग्रामस्थ श्री वामन राजाराम राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे, श्री नाना राणे, श्री बाळा राणे हे प्रयत्नशील आहेत त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. यानंतर खोलीमालक श्री मधुकर संभाजी राणे यांच्या मार्फत चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. असेच सहकार्य त्यांच्याकडून अपेक्षित आहे. यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री भगवान रामचंद्र साटम यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

---